# नियमित फौजदारी खटला क्रं. ३१३/२०२६ मध्ये निशाणी क्र. ७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्रं. २ दत्ता तानाजी रुपनवर याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ४९७ अन्वये अपराध क्रं. १३७/२०२६ मधील भारतीय न्याय संहिताचे कलम १०९, ११८(१), ११५(२), १२६(२), १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९० सह आर्म कायदयाचे कलम ४ व २५ अन्वये नातेपुते पोलीस स्टेशन, माळशिरस मधील जप्त हिरो कंपनीची स्प्लेंडर काळया रंगाची मोटारसायकल वाहन क्रं.एम.एच.४५/बी.ए.६७०३ चा अंतरिम ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अभियोगपक्षाने उक्त वाहनाचा अंतरिम ताबा देण्यास निशाणी क्रं.११ खाली हरकत घेऊन कथन केले आहे की, सदर जप्त वाहन आरोपीस परत केल्यास वाहनामध्ये फेरबदल करुन मा. न्यायालयात आवश्यक असेल तेंव्हा वाहन हजर करणार नाही. तसेच सदर वाहन पुन्हा गुन्हयात वापरण्याची शक्यता आहे, करीता अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. अर्ज व त्यावरील जबाबाचे सुक्ष्म वाचन केले. संचिकेचे व दोषारोपपत्राचे अवलोकन केले. अर्जदाराने त्याचे मागणीच्या पुष्ठयर्थ दप्तरी आर.सी.बुकची प्रमाणित प्रत निशाणी क्रं. १०/१ वर व आधारकार्डची प्रमाणति प्रत निशाणी क्रं. १०/२ वर सादर केलेली आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे व दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता, आरोपी क्रं. २ दत्ता

तानाजी रुपनवर म्हणजेच अर्जदार याच्याकडुन हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल काळया रंगाची तिचा वाहन क्रं. एम.एच.४५/बी.ए.६७०३ ही जप्त करण्यात आलेली असुन ती एम.आर. क्रं.५८/२०२६ अन्वये पोलीस ठाणेत जमा आहे. सदर दाखल केलेल्या दस्तांवरुन असे दिसुन येते की, जप्त हिरो कंपनीची स्प्लेंडर काळया रंगाची मोटारसायकल वाहन क्रं.एम.एच.४५/बी.ए. ६७०३ ही अर्जदाराचे मालकीचे आहे.

**४.** मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***<u>''सुंदरभाई अंबालाल देसाई वि. राज्य गुजरात २००३ ऑल एम.आर.(क्रिमीनल)३६३(सुप्रीम कोर्ट)</u>*** या प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसार जप्त मुद्देमाल अर्जदारास देणे उचित ठरेल. खटल्याचा निकाल लागण्यास निश्चितच अवधी लागणार असल्याने जप्त मुद्देमाल नातेपुते पोलीस ठाणे, माळशिरस येथे जमा आहे. एकंदरीत अर्जदाराने ते जप्त रक्कमेचा अंतरिम ताबा मिळण्यास पात्र असल्याचे शाबीत केले असल्याने अटी शर्तीवर अर्ज मंजूर करणे विधीसंगत वाटते. त्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तपासिक अंमलदार, नातेपुते पोलीस ठाणे, माळशिरस यांना आदेशित करण्यात येते की अपराध क्र. १३७/२०२६ मधील भारतीय न्याय संहिताचे कलम १०९, ११८(१), ११५(२), १२६(२), १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९० सह आर्म कायदयाचे कलम ४ व २५ अन्वये नातेपुते पोलीस ठाणे, माळशिरस मधील अर्जदारचे

जप्त हिरो कंपनीची स्प्लेंडर काळया रंगाची मोटारसायकल वाहन क्रं.एम.एच.४५/बी.ए.६७०३ चे अंतरिम ताबा अर्जदार तथा आरोपी क्रं. २ दत्ता तानाजी रुपनवर यास रक्कम रुपये ५०,०००/– च्या बंधपत्रावर खालील अटींवर देण्यात यावा.

३. अर्जदारास आदेशित करण्यात येते की, त्याने मालमत्तेचे अभिरक्षण करावे, मालमत्तेच्या मूळ स्वरुपात बदल करु नये अथवा त्रयस्थ इसमास विक्री करु नये व आदेशित केल्यानंतर मालमत्ता न्यायालयात हजर करावी.

४. अर्जदाराने वर नमूद जप्त वाहन इतर गुन्हयाकामी वापरु नये.

५. तपासिक अंमलदार, नातेपुते पोलीस स्टेशन, ता. माळशिरस यांना आदेशित करण्यात येते की, वर नमूद जप्त वाहनाचा ताबा अर्जदारास देताना, फोटोसहीत योग्य तो पंचनामा करावा.

Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.08.07 17:43:24 +0530

दिनांक ०७/०८/२०२६.

**(आदित्य अ. व्यास)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order is same word to word as per the original order.

(a) Name of the Stenographer : S.T.Korbu

(b) Name of the Court : 2nd Jt.C.J.J.D. & J.M.F.C, Malshiras, Dist Solapur

(c) Order signed by P.O. On : 07/08/2026.

(d) Order uploaded on : 07/08/2026.